**<u>रे.दि.मु.क्र.५४५/२०२२</u>**

मनिष दिपक निप्रुळ वगैरे

वि.

**मालन तानाजी निप्रुळ वगैरे**

## रे.दि.मु.नं. ५४५/२०२२ मधील निशाणी ५२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र ४ यांनी त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येवून कैफियत दाखल करणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र ४ यांचे म्हणण्यानुसार, त्याला दाव्याचे समन्स सप्टेंबर २०२२ मध्ये प्राप्त होवुन ते दाव्याचे कामी हजर झालेनंतर त्यांना दाव्याचे वादाबाबत सर्व कागदपत्रांचा उलघडा वेळेत न झाल्यामुळे तसेच सदर दावा मिळकती बाबत वादी यांनी पुर्वी दाखल केलेल्या रे.दि.मु. ११४/२००९ या दाव्यातील आवश्यक ते सर्व कागदपत्रे वेळेत हाती न आल्यामुळे त्यास कैफियत मुदतीत दाखल करता आली नाही. तसेच सदरच्या दाव्याबाबत इतर दिवाणी न्यायालयात प्रलंबित असणाऱ्या स्पे.दि.मु. ८९/२०२२ व रे.दि.मु.४५७/२०२२ या दाव्यातील कागदपत्रे वेळेत हाती न आल्याने आवश्यक ती माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांना कैफियत दाखल करणेस विलंब झाला. प्रतिवादी याने जाणीवपुर्वक विलंब केलेला नसुन वरील नमुद संयुक्तीक कारणास्तव झाल्याने तो माफ होवुन त्यांना कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

३.    सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे **(नि.५४)** दाखल करुन प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज, खोटा व लबाडीचा असुन त्यातील संपुर्ण कथने त्यांनी नाकारली आहेत. उलटपक्षी प्रतिवादी यांना २०.०९.२०२२ मध्ये समन्सची बजावणी झालेली असुन ते दाव्याचे कामी हजर झालेले होते. प्रस्तुत प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणेस झालेल्या विलंबाबाबत दिलेली कारण ही योग्य व संयुक्तिक अशा स्वरुपाची नसुन केवळ दाव्याचे कामकाज चालविणेस विलंब करण्याच्या उद्देशाने कैफियत दाखल करणेस विलंब केल्याचे दिसुन येत आहे. तसेच प्रतिवादी या स्वतः वकील असुन त्यांना कायदयाचे ज्ञान आहे. प्रतिवादी यांनी जाणुनबुजुन कैफियत देणेची टाळाटाळ केली आहे. सबब, प्रतिवादी यांना प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास वादी यांना रक्कम रुपये ५,०००/– असा खर्च लादावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

४.    वादीने सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुद्ध दावा मिळकती मधील हिस्सा वाटुन मिळणेकरीता व दावा कलम मिळकती बाबत झालेले खरेदीपत्र व बक्षीसपत्र बंधनकारक नसलेचे रद्दबातल असलेचे जाहिर ठरावा करीता दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी हे दाव्याकामी हजर झाले परंतु त्यास कैफियत दाखल करण्यास १७ महिन्यांचा विलंब झालेला आहे. दावा गुणदोषावर चालविण्यासाठी व दाव्याच्या निर्णयासाठी प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. कैफियत दाखल करुन घेतले नाहीतर प्रतिवादीचे अपिरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन प्रतिवादीला त्यांची बाजु मांडण्यासाठी कैफियत दाखल

करण्याची संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे दाव्याच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादीवर खर्च लादून कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र ४ याचा निशाणी ५२ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र ४ वर खर्च रक्कम रुपये १,०००/–(एक हजार रुपये मात्र) लादून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र ४ची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

PRAJAKTA GAJANAN SHELAR

Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2024.08.06 11:32:15 +0530

स्थळ – कराड (पी. जी. शेलार)

दिनांक–०५.०८.२०२४ ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड